This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
हस्तलिखित संग्रह

दाखल क्र M697 विषय पुराण
नाव. नरसिंहमहात्म्य (मुद्रित) (मराठी भाषांतर)
लेखक/लिपीकार —
पृष्ठ २५ काळ — पूर्ण/अपूर्ण

Checked 2012

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीगणेशायनमः ॥ ॥ ॐनमोजी गणनायका ॥ एकदंता वरदायका ॥ स्वरूप-
सुंदरा विनायका ॥ करी कृपा मजवरीं ॥ १ ॥ आतां नमूं ब्रह्मकुमारी ॥ हंसारूढ वा-
गेश्वरी ॥ वीणा शोभे दक्षिण करीं ॥ विजयमुर्ती सर्वदा ॥ २ ॥ नमन माझें गुरुवर्या ॥
सुखमूर्ति करुणालया ॥ नमूं संतश्रोतियांच्या पायां ॥ अभेदभेदा करूनी ॥३॥ आतां
नमूं श्रीपांडुरंगा ॥ यावें तुवां कथेचिया प्रसंगा ॥ निरसूनि माझिया भवसंगा ॥ करीं
कृपा मजवरी ॥ ४ ॥ गुजराथ भाषेची कथा ॥ नवग्रहांची तत्वतां ॥ ही ऐकतां एक
चित्ता ॥ संकट व्यथा न बाधिती ॥ ५ ॥ आतां उज्जनी नाम नगरीं ॥ राजा विक्रम
राज्य करी ॥ तेथील चरित्राची परी ॥ ऐका चित्त देऊनियां ॥ ६ ॥ कोणी एके दिवशीं
प्रातःकाळीं ॥ बैसली होती सभामंडळी ॥ तेथें महापंडीत त्या काळीं ॥ लहान थोर
बैसले ॥ ७ ॥ ऐसी सभा बैसली घनदाट ॥ तेथें चर्चा निघाली सुभट ॥ ह्मणती नव-
ग्रहांत कोण श्रेष्ठ ॥ सांगावें नीट निवडोनी ॥ ८ ॥ कोण्या ग्रहाची कैसी स्थिती ॥
कैसी पूजा कैसी मती ॥ कोण रूप कैसी गती ॥ ऐसें यथार्थ सांगावें ॥ ९ ॥ ऐसें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ऐकतांचि उत्तर ॥ पंडीत सरसावले समोर ॥ काढोनी पुस्तकांचा संभार ॥ बोलती ते यथामतीनें ॥ १० ॥ प्रथम एक पंडीत बोलिला ॥ रवीग्रह तो असे भला ॥ जो लागे त्याच्या उपासनेला ॥ त्यासी ग्रहपीडा न बाधी ॥ ११ ॥ रवी तो सूर्यनारायण ॥ जे नर झाले तत्परायण ॥ त्यांचीं विघ्नें होती निरसन ॥ महासामर्थ्य रविचें ॥ १२ ॥ आधि व्याधि दरिद्र ॥ स्मरणमात्रेंचि होती दूर ॥ मग उपासना करी जो नर ॥ चिंतिले अर्थ सर्व पुरतो ॥ १३ ॥ रवी तो मुख्य दैवत ॥ त्याविण सर्वही जाणा व्यर्थ ॥ नवग्रह आज्ञा पाळित ऐसा श्रेष्ठ ग्रह हा ॥ १४ ॥ ऐकतां रवीची वार्ता ॥ आणि त्या इतर ग्रहांची कथा ॥ तेणें निवारे सर्व व्यथा ॥ ऐसे नवग्रहही समर्थ ॥ १५ ॥ परी रवि असे महाबळी ॥ सर्वांमाजीं अतुर्बळी ॥ प्रत्यक्ष दिसतो नेत्रकमळीं ॥ तो हा सूर्य नारायण ॥ १६ ॥ तंव दुसरा पंडीत बोलत ॥ सोमासी असे बळ अद्भुत ॥ तो माळी असे ह्मणवित ॥ वनस्पती पोषितसे ॥ १७ ॥ जयाचें आराध्य दैवत ॥ शिव सांब कैलासनाथ ॥ त्याच्या भाळीं हा विलसत ॥ ह्मणोनी श्रेष्ठ जाणावा ॥ १८ ॥ चंद्र वर्षे अमृतास तृप्त करी सर्व देवांस ॥

निशिराज महारूपस ॥ षोडश कळा जयासीं ॥ १९ ॥ तो न गांजीच कोणासी ॥ अति सौख्यदाता सर्वांसी ॥ सदासर्वदा निर्मळ मानसीं ॥ धन्य जयाचें पूजन ॥ २० ॥ मग तिसरा पंडित बोलत ॥ ऐक राया सुनिश्चित ॥ मंगळ तो महासमर्थ ॥ कथा ऐक तयाचो ॥ २१ ॥ मंगळ ग्रह महाक्रूर ॥ जैसी कां ते खड्गाची धार ॥ तयाचा न कळे पार ॥ सर्वग्रहांमाजी वरिष्ठ हा ॥ २२ ॥ मंगळग्रह सोनार ॥ क्रूरता जयाची अति थोर ॥ परि तो पूजकासी कृपाकर ॥ मंगल करी सर्वदा ॥ २३ ॥ जे गर्व धरूनि पूजा न करिती ॥ मग तो खवळे उग्रमूर्ती ॥ विलया जाय संतति संपत्ती ॥ शेवटीं नाश करी जीवित्वाचा ॥ २४ ॥ तोचि पूजकासी सदा प्रसन्न ॥ सर्व अर्थ करी पावन ॥ सर्व दुःख निरसून ॥ अंतर्बाह्य संरक्षी ॥ २५ ॥ तंव बोले चवथा पंडित ॥ बुध असे महाबळवंत ॥ बुधाचा प्रताप अद्भुत ॥ सर्व ग्रहांमाजी ॥ २६ ॥ बुध जातीचा असे वाणी ॥ नवग्रहांत शिरोमणी विघ्नें नासतो तयाच्या पूजनीं ॥ सर्वानंद प्राप्त करी ॥ २७ ॥ बुध ज्यावरी कृपा करी ॥ लक्ष्मीवंत त्यासी करी ॥ ऐसा तो महापरोपकारी ॥ बुधग्रह जाणिजे ॥ २८ ॥ बुधग्रह आहे ज्यास नी-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ट ॥ सर्व मार्ग सुचती सुभट ॥ कोणत्या कार्यासही तूट ॥ तो न करी कल्पांतीं ॥२९॥ बुधाची बुद्धी भारी ॥ कोणासी निष्ठुरता तो नकरी ॥ संसारचिंता हरी ॥ प्राणीमात्रांची ॥३०॥ मग बोले पांचवा पंडित ॥ गुरूचे सामर्थ्य असे अद्भुत ॥ गुरु तो श्रेष्ठ सर्वांत । इंद्रादिदेवां समस्तां ॥ ३१ ॥ गुरुज्ञानाचा न कळे पार ॥ भाविकांसी तो करुणाकर ॥ कर्माकर्मांचा करी चूर ॥ भवभयव्यथेसी ॥ ३२ ॥ दुःख आणि दारिद्र्य रोग ॥ स्मरणमात्रें होय भंग ॥ नवग्रहांत महायोग्य ॥ ऐसा जाणिजे ॥ ३३ ॥ गुरु जातीचा असे ब्राह्मण ॥ सर्वांत श्रेष्ठ असे वर्ण ॥ सर्व देव करिती मान्य ॥ गुरुवचनासी ॥ ३४ ॥ गुरु असे ज्ञानाचा पुरा ॥ तयाच्या साम्यासी नसे दुसरा ॥ त्यापुढें नुरेची थारा ॥ कल्पनेचा कदाही ॥ ३५ ॥ म्हणोनी करितां गुरुसेवा ॥ मग ग्रहाचा कोण केवा ॥ गुरु सर्वभावें भजावा॥ तेणें संतोष सर्व ग्रहांसी ॥३६॥ शिव करी गुरुपूजनासी ॥ तेथें पाड काय इतरांसी ॥ऐका श्रेष्ठ तो सर्वांसी ॥ आगमागम ॥ ३७ ॥ तंव सहावा पंडित बोलिला । शुक्रग्रह असे बहु भला ॥ जेणें राक्षसां उपकार केला ॥ संजीवनीमंत्रें करोनी ॥३८॥ शुक्र गुरु तो दैत्यां-

चा ॥ त्रिभुवनीं धाक वाहती जयाचा॥पार न कळे सामर्थ्याचा॥म्हणोनि श्रेष्ठ तो॥३९॥ शुक्राची शक्ति आहे फार॥तो करी कर्माकर्मांचा चूर ॥ विघ्नें पळती दूरच्या दूर ॥ शुक्राचें नाम घेतां ॥ ४० ॥ शुक्रपूजनीं जे तत्पर॥ त्यांच्या शौर्यासी नाहीं पारावार॥जो दिव्यदेही निरंतर ॥ एकाक्ष तो ॥ ४१ ॥ आधि व्याधि दुःख दरिद्र ॥ स्मरणमात्रें होय दूर ॥ सर्वाभीष्ट परिकर ॥ प्राप्त करी पूजका ॥ ४२ ॥ नवग्रहांत शिरोमणी ॥ ज्याचा महिमा वर्णिला पुराणीं॥ मान्यता श्रेष्ठ सर्वांहूनी ॥ शुक्राची असे जाणपां॥४३॥ ऐसे हे सहा ग्रह ऐकोनि राजा ॥ तर्जनी मस्तक डोलवी वोजा ॥ म्हणे उत्तम कथिलें काजा ॥ अखंडित यांतें स्मरावें ॥४४॥ आणिक ग्रह राहिले कोण ॥ सांगा पंडित होनिवडून ॥ कैसीं तयांचीं नामें खूण ॥ त्या मूर्तीसीं बोलिजे ॥ ४५ ॥ मग संकेतें बोले पंडित ॥ राहु आणि दुसरा केतु ॥ हे उभयतां अतिअद्भुत ॥ दैत्यकुळींचे असती ॥ ४६ ॥ मातंग जातीचे दोन्हीं ॥ दुष्ट क्रिया म्हणवोनी ॥ त्यांच्या दर्शनें चंद्रसूर्य गगनीं॥चळचळां कांपती ॥ ४७॥ राहु पीडी चंद्रासी ॥ केतु तो सूर्यासी ॥ ग्रहण बोलिजे तयासी॥प्रत्यक्ष

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दृष्टीसी दिसतसे ॥ ४८ ॥ प्राणिमात्र सर्वजन ॥ त्यांसी न सांडिती पीडेवीण ॥ परी केलिया पूजनस्मरण ॥ किंचित् पीडा करिताती ॥ ४९ ॥ राहु महापीडक अनिवार माया ॥ तद्रुपचि केतु जाण राया ॥ उभयतांची एक चर्या ॥ पूजनस्मरणें संतोषती ॥ ५० ॥ सर्व-ग्रहांपरीस अतिक्रूर ॥ जनासी पीडा करिती फार ॥ ह्मणोनि पूजनस्मरण निरंतर ॥ राहुकेतूंचें करावें ॥ ५१ ॥ तंव नववा पंडित बोलत ॥ शनिग्रह श्रेष्ठ अव-घ्यांत ॥ बलाढ्य होय अतिअद्भुत ॥ न कळे कळा तयाची ॥ ५२ ॥ तो ज्यावरी करी कृपा ॥ त्यासी सर्व मार्ग असे सोपा ॥ ग्रह दिक्पाळांवर छापा ॥ तया शनिग्रहाचा ॥ ५३ ॥ ज्यावरी तो कोपासी चढे ॥ तयावरी नाना विघ्नें येत रो-कडे ॥ तयाचा संसार बिघडे ॥ न राहे कल्पांती ॥ ५४ ॥ शनिदेव महाक्रोधी ॥ ज्याचा पराजय नोहे युद्धीं ॥ देवदानवां त्रिशुद्धी ॥ दुःखदाता शनिदेव ॥ ५५ ॥ जो कां भाविक सज्ञान नर ॥ तो या ग्रंथाचा करी आदर ॥ पूजनस्मरण निरंतर ॥ त्यावरी कृपा करी शनिदेव ॥ ५६ ॥ शनैश्चराची मूर्ती काळी ॥ तो जातीचा असे तेली ॥ चरण पंगु सुरत

चांगुली ॥ पूजा करी काळभैरवाची ॥ ५७ ॥ त्याची दृष्टि पडे जयावर ॥ करी तयाचा चकनाचूर ॥ अथवा कृपा करी जयावर ॥ तयासी सर्व आनंद प्राप्त होय ॥ ५८ ॥ दृष्टीचा ऐका चमत्कार ॥ जन्मला जेव्हां शनैश्चर ॥ तेव्हां दृष्टि पडली पित्यावर ॥ तेणें कुष्ठ भ-रला सर्वांगीं ॥ ५९ ॥ पित्याच्या रथीं होता जो सारथी ॥ तो पांगुळ झाला निश्चिती ॥ अश्वांचिया नेत्रांप्रती ॥ अंधत्व आलें तत्क्षणीं ॥ ६० ॥ तेव्हां त्यांनीं उपाय केले फार ॥ परी गुण नयेची अणुमात्र ॥ जंव दृष्टि फिरवी शनैश्चर ॥ तंव तिघेही आरोग्य जाहले ॥ ६१ ॥ ऐसें ऐकतां राजा विक्रम ॥ हांसूनि बोले सप्रेम ॥ ह्मणे पुत्र जन्मोनी काय काम ॥ ऐसा अपवित्र जो ॥ ६२ ॥ तो पुत्र नव्हे केवळ वैरी ॥ जो उपजतांच ऐसें करी ॥ पुढें तो काय न करी ॥ सांगा पंडित हो ॥ ६३ ॥ ऐसें बोलिला हांसोन ॥ करीं टाळी वाजवी गर्जोन ॥ सभेसी विनोदवचन ॥ ह्मणे हा पुत्र कैसा हो ॥ ६४ ॥ ऐसें बोलतां तये अवसरीं ॥ कैसी वर्तली नवलपरी ॥ ती ऐकावी आतां चतुरीं ॥ चित्त देऊनियां ६५ ॥ त्या समयीं शनिदेव विमानीं ॥ जात होते बैसोनी ॥ रायाचें वाक्य ऐकतां तत्क्षणीं ॥ विमान खालीं उतरलें ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ ६६ ॥ अकस्मात् येऊनियां सभेंत ॥ बैसले तेव्हां विमानासहित ॥ तंव पाहते झाले सभापंडित ॥ ह्मणती आले शनिदेव ॥ ६७ ॥ मग राव उठे झडकरोनी ॥ जाऊनि नमन करी चरणीं ॥ तंव टाकिला झिडकारोनी ॥ शनिदेवानें ॥ ६८ ॥ ह्मणे तूं राजा ऐसा मस्त ॥ टवाळी करिसी अद्भुत ॥ याचा चमत्कार क्षणांत ॥ दावीन पाहें आतांची ॥ ६९ ॥ तूं फार करितोसि टवाळी ॥ नसतीच चढविली कळी ॥ तरी कन्याराशीस मूळीं ॥ तुजला ग्रह मी आलों ॥ ७० ॥ तरीं आतां पाहें माझा चमत्कार ॥ तूं नको करूं गर्व फार ॥ ऐसें वदोनि अतिसत्वर ॥ विमानारूढ पैं झाला ॥ ७१ ॥ तंव तो राव लागे चरणांसी ॥ ह्मणे कृपा करावी दीनासी ॥ अन्याय घालीं पोटासीं ॥ कृपाळुवा शनिदेवा ॥ ७२ ॥ तरी तो न मानीच शनिदेव ॥ ह्मणे तुज दाखवीन अनुभव ॥ तेव्हां मनीं खिन्न जाहला राव ॥ चिंता मानसीं फार करी ॥ ७३ ॥ मग ह्मणतसे पंडितांला ॥ आह्मीं महाग्रह उगाचि छळिला ॥ तो आतां कष्टवील आह्मांला ॥ तरी कैसें करावें आतां ॥ ७४ ॥ जें जें पुढें होणार ॥ ह्मणोनि बुद्धि सुचे तदनुसार ॥ तरी जें असेल लिखिता-

क्षर तैसें आतां होईल ॥ ७५ ॥ राव दिलगीर जाहला मानसीं ॥ विसर्जन करी सभेसी ॥ जाता जाहला मंदीरासी ॥ कांहीं अंतरीं सुचेना ॥ ७६ ॥ करूनीयां संध्यास्नान मग करीतसे भोजन ॥ तदनंतर करीता जाहला शयन ॥ नावेक पलंगावरी ॥ ७७ ॥ ऐसें करितां एक मास ॥ जाहला राया विक्रमास ॥ मग काय वर्तलें त्या कथेस ॥ तेंची आतां ऐकिजे ॥ ७८ ॥ राया विक्रमासी आला शनी ॥ बारावा अती कुस्थानीं ॥ जेणें त्रासिले बहुत प्राणी ॥ अभाविकां पीडितसे ॥ ७९ ॥ तेव्हां पंडित बोलती वाचे ॥ राया पूजन करीं शनिग्रहाचें ॥ साडेसात वर्षें नेमाचें ॥ सामर्थ्य आहे जाणिजे ॥ ८० ॥ तुह्मी विनोदें हांसलां शनीसी ॥ तरी तो कष्टवील तुह्मांसी ॥ जो कां गांजितो त्रैलोक्यासी ॥ तोचि महाग्रह जाणिजे ॥ ८१ ॥ चित्त करोनियां एकाग्र ॥ ऐकावा पूजेचा प्रकार ॥ जेणें करोनि शनैश्चर ॥ कृपा करील तुह्मांवरी ॥ ८२ ॥ प्रथम करोनि औषधी स्नान ॥ मग करावें प्रतिमेचें पूजन ॥ अश्वाचा नाल घेऊन ॥ त्याची प्रतिमा करावी ॥ ८३ ॥ शास्त्रविधी पूजा निर्धार ॥ मग तैल अभिषेककर ॥ मृत्तिकेच्या कुंभावर ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याची स्थापना करावी ॥ ८४ ॥ स्थापना झालिया जाण॥पूगीफल ब्राह्मणासी देऊन ॥ तेवीस सहस्र जप संपूर्ण ॥ यथासांग करावा ॥ ८५ ॥ जपसंख्या जाहलियावरी ॥ चतुर्थांश हवन करीं ॥ हवन झालियाउपरी ॥ दानें करावीं शनीचीं ॥ ८६ ॥ मग जपकर्त्या ब्राह्मणासी ॥ शनैश्चररूप मानूनि त्यासी ॥ दक्षिणा देऊनि पूजेसी ॥ प्रसन्नचि करावें ॥ ८७ ॥ मग करावें ब्राह्मणभोजन ॥ यथाशक्ति द्यावें दान ॥ ब्राह्मण तृप्त होतां पूर्ण ॥ संतोष पावे शनिदेव ॥ ८८ ॥ जेवीं रक्षी बाळकासी माता ॥ तैसें रक्षी निजभक्ता ॥ पंडित ह्मणती राया समर्था ॥ गोष्टी एवढी ऐकावी ॥ ८९ ॥ राजा ह्मणे पंडिताला ॥ शनि न मानीच आह्मांला ॥ तोचि माता पिता वहिला ॥ रक्षी तोचि पैं जाणा ॥ ९० ॥ मग बोले विक्रम पंडितासी ॥ तुह्मी जावें आपुल्या गृहासी ॥ जें होणार असेल तें निश्चयेंसीं ॥ घडूनि येईल न टळेची ॥९१॥ ऐसें बोलोनियां उत्तर ॥ काय जाहला चमत्कार ॥ चित्त करोनियां स्थिर ॥ श्रवण करावें सर्वही ॥ ९२ ॥ असो मग कोणे एके दिवशीं ॥ दोन प्रहरांच्या समयासी ॥ कारवानवेषें उज्जनीसी ॥ घोडे विकावया

आला शनिदेव ॥ ९३ ॥ रूप पालटोनी आपुलें ॥ वारू विकावया आणिले॥ तंव तेथें गिऱ्हाईक पातले ॥ रावही आला त्या स्थानीं ॥ ९४ ॥ तेव्हां किंमत पुसतसे रावो ॥ तयासी ह्मणे शनिदेवो ॥ वारू फिरवूनि पहा हो ॥ मग कळेल मोल तयाचें ॥ ९५ ॥ तेव्हां सारंगा वारू राव आणवित ॥ चाबुकस्वारासी वरी बैसवित ॥ तेणें घोडा फिरविला चौगानांत ॥ अति उत्तम फिरतसे ॥ ९६ ॥ तंव दुसरा घोडा अबलख ॥ त्याचें मोल रुपये लक्ष एक ॥ तो सोडूनि तात्काळिक ॥ आणिला विक्रमापाशीं ॥९७॥ तंव त्या सौदागरें काय केलें ॥ राया विक्रमासी बैसविलें ॥ घोडा फिरवितां राव बोले ॥ अति उत्तम फिरतसे ॥ ९८ ॥ तंव त्या घोड्यासी कोरडा मारितां ॥ तेव्हां घोडा उडाला गगनपंथा ॥ पवनवेगें वारू जातां ॥ महावनांत ते समयीं ॥ ९९ ॥ अधिक कोरडा मारितां ॥ तों तों अधिक जाय गगनपंथा ॥ थोर अवस्था होय चित्ता ॥ केवीं वर्तलें ह्मणवोनी ॥ १०० ॥ दूरदेश अतिउजाडी ॥ जेथें घोर वन महाझाडी ॥ तेथें नदीच्या पैलथडी ॥ घोडा जाऊनि उतरला ॥ १ ॥ तेथें राव उतरला खालीं ॥ तंव नवलपरी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वर्तली ॥ वारू नाहीं नदी गुप्त झाली ॥ झाडाझुडांसहित ॥ २ ॥ तेव्हां आश्चर्य वाटलें विक्रमासी ॥ ह्मणे ईश्वरी गति न कळे कोणासी ॥ वारू आणि वनासी ॥ काय विचार पैं जाहला ॥ ३ ॥ तंव अस्तासी पावला वासरमणी ॥ अंधकार प्रवर्तली रजनी ॥ पुढें मार्ग न दिसे नयनीं ॥ मग तेथेंचि पहुडला ॥ ४ ॥ चार प्रहर गेलियावरी ॥ उदयासी आला तमारी ॥ मग तो एका नगराचा मार्ग धरी ॥ राजा विक्रम आपण ॥ ५ ॥ तंव तेथोनि चार योजनें दूरीं ॥ तामलिंदा नाम नगरी ॥ तेथें जाता जाहला ते अवसरीं ॥ हळू हळू पोहोंचला ॥ ६ ॥ इकडे उज्जनीजी कथाराहिली ॥ ती आतांपाहिजे श्रवण केली ॥ नगरजनांनीं वाट पाहिली ॥ चार प्रहर रायाची ॥ ७ ॥ तेव्हां सौदागर ह्मणे प्रधानासी ॥ वारू द्यावा आमुचा आह्मांसी ॥ कोणीकडे नेलें वारूसी ॥ राया विक्रमानें ॥ ८ ॥ तंव पाहते झाले नगराबाहेर ॥ कोसीं दो कोसीं कोस चार ॥ परी कोठें न दिसे राजेश्वर ॥ मग चिंता प्रवर्तली ॥ ९ ॥ तेव्हां सौदागर ह्मणे प्रधानासी ॥ सत्वर शोधूनि आणा रायासी ॥ नाहीं तरी आह्मांसी ॥ पैका द्यावा वारूचा ॥ ११० ॥ तेव्हां प्रधानासी पडली

चिंता ॥ मनीं ह्मणे कैसें करावें आतां ॥ रायाचा शोध न लागे तत्त्वता ॥ सौदागरें अडविलें ॥ ११ ॥ मग प्रधानानें काय केलें ॥ सौदागरासी बोलाविलें ॥ ह्मणे वारूचें मोल काय वहिलें ॥ तें सांगा आह्मांसी ॥ १२ ॥ तयानें मोल सांगतांचि झडकरी ॥ मग पैका घातला तयाचे पदरीं ॥ तेव्हां प्रधानासी पुसोनि सत्वरीं ॥ जाता झाला शनिदेव ॥ १३ ॥ सौदागर गेलिया पाठीं ॥ मागें काय वर्तली गोष्टी ॥ नगरजन सर्व होती कष्टी ॥ देश पट्टणें धुंडिलीं ॥ १४ ॥ नगरीं झाली ऐसी परी ॥ इकडे राजा विक्रम काय करी ॥ तया तामलिंदापूर नगरीं ॥ ग्रामामाजी प्रवेशला ॥ १५ ॥ तंव तेथें व्यवहारी सावकार ॥ जातीचा वैश्य धनाढ्य थोर ॥ तेव्हां तयाचें दुकानावर ॥ राजा नावेक स्थिरावला ॥ १६ ॥ सावकाराचें दुकानीं ॥ विक्री होतसे द्विगुणीं ॥ त्यानें भला माणुस जाणोनी ॥ आदर केला तयाचा ॥ १७ ॥ मग व्यवहारी बोले भावें ॥ तुह्मी आतां मुखमार्जन करावें ॥ जातीचे कोण आह्मां सांगावें ॥ नामग्राम तुमचें पैं ॥ १८ ॥ राजा ह्मणे तया वैश्यासी ॥ आह्मीं क्षत्रिय असों परियेसीं ॥ आमुचा मुलुख दूरदेशीं ॥ क्षण एक येथें उतरलों ॥ १९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मग मावकारें करविला पाक ॥ अतिउत्तम षड्रसादिक ॥ भात पुऱ्या सांडगे देख ॥ करविले बहुत प्रकार ॥ २० ॥ मग तो वैश्य ह्मणे क्षत्रिया ॥ उठा वेगीं जेवावया भोजन करोनि लावलाह्यां ॥ मग जावें सुखरुप ॥ २१ ॥ मग राव करी संध्यास्नान ॥ सत्वर सारिता झाला भोजन ॥ उत्तम प्रकारचें पक्कान्न ॥ सेवूनि तृप्ति पावला ॥ २२ ॥ तेव्हां वैश्य ह्मणे क्षत्रियासी ॥ सत्य सांगावें आह्मांसी ॥ मग विक्रमें यथार्थ कथिलें तयासी॥ तेव्हां तो निज अंतरीं समजला ॥ २३॥ आतां त्या सावकाराची कन्यका ॥ नाम तिचें अलंलिका ॥ तिचा पण हाचि देखा ॥ इच्छिला वर वरावा ॥ २४॥ परी तिसी न मिळे इच्छावर ॥ वैश्य शोध करी निरंतर ॥ तंव हा विक्रमराजा परिकर ॥ ह्मणे यासी द्यावी कुमारिका ॥ २५ ॥ तेव्हां तो बोले कुमारिकेसी ॥ बाई उत्तम वर आणिला तुजसी ॥ आतां तूं माळ घालीं यासी ॥ नकरीं अनुमान ॥२६॥ हा स्वरूपें आहे सुंदर ॥ बत्तीस लक्षणीं परिकर ॥ हा भाग्यवंत जाण वर ॥ यासी वरीं कुमारिके ॥ २७ ॥ तेव्हां कुमारी बोले पित्यासी ॥ तुह्मी बहुत वर्णितां यासी ॥ परी न भरतां मम मानसीं ॥ न वरीं

त्यासी निर्धारीं ॥ २८ ॥ आज पाहीन याचें लक्षण ॥ कैसें चातुर्य काय ज्ञान ॥ भाषणावरूनि प्रमाण ॥ सर्व कळों येईल ॥ २९ ॥ ऐसें वदतां जाहली सांज ॥ तंव अस्तासी गेला भानुराज ॥ पित्यासी ह्मणे महाराज ॥ पांथिकासी पाठवावें ॥ ३० ॥ मग वैश्य ह्मणे क्षत्रियासी ॥ जावें निद्रा करावयासी ॥ अति रम्य चित्रशाळेंसी ॥ तेथें सर्व विदित होईल ॥ ३१ ॥ मग तो विक्रम उठोनि चालिला ॥ जेथें होती चित्रशाळा ॥ तेथें हंस मयूर कोकिळा ॥ नाना प्रकारचे लेपिले ॥ ३२ ॥ चित्रें रेखिलीं बहुतकुशलता ॥ वारू आणि गजरथा ॥ चित्रकारें चित्र रेखितां ॥ आळस कांहीं न केला ॥ ३३ ॥ पुढें पाहें राजा नयनीं ॥ तंव अपूर्व मंचक देखिला तत्क्षणीं ॥ त्यावरी पासोडा लेप दोन्ही ॥ आंथरुण घातलेंसे ॥ ३४ ॥ रत्नखचित सुरंग पलंग ॥ त्यावरी नाना परीचे रंग ॥ जाई जुई पुष्पें सुरंग ॥ सेज केली अति निगुतीं ॥३५॥ वरती लोंबती मोतियांचे घड ॥ चांदवा करीतसे फडफड ॥ समया जळती धडधड ॥ चतुष्कोणीं चार पैं ॥३६॥ ऐसें पाहूनि राव झाला चकित ॥ ह्मणे न कळे काय आहे वृत्तांत ॥ हा कोण देश कोणती गत ॥ होईल

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ती कळेना ॥३७॥ कर्माच्या गति असती गहना ॥ जें जें होणार तें कदा चुकेना ॥तें तें भोगिल्याविण सुटेना ॥ देवादिकां सर्वांसी ॥३८॥ तरी हें शनिदेवाचें छळण ॥ त्यानें ही माया रचिली जाण ॥ आतां होणार तें होय आपण ॥ जो सर्वांसी पीडितसे ॥ ३९ ॥ ऐसा मनीं करोनि विचार ॥ मग निद्रा करी राजेश्वर ॥ तया पलंगीं साचार ॥ सावधान निजे अंतरीं ॥१४०॥ नाना परीचे करी विचार ॥ बुद्धीचे तरंग अपार ॥ ह्मणोनि निद्रा न ये साचार ॥ परी मुख आच्छादन केलेंसे ॥ ४१ ॥ रायें केली ऐशी परी ॥ मग वैश्य कन्यका काय करी ॥ पंचारती घेऊनि करी ॥ आली रंगमहालाकारणें ॥ ४२ ॥ तिनें केला सर्व शृंगार ॥ गळां शोभती मोतियांचे हार ॥ केशर कस्तूरी कर्पूर ॥ सुगंध द्रव्यें आणिलीं पैं ॥४३॥ पायीं पैंजण नेपुरें ॥ तीं झणत्कार करिती गजरें ॥ पदकांसी जडिले दिव्य हिरे ॥ त्यांचें तेज फांकतसे ॥४४॥ ती जैसी पुतळीच केवळ ॥ बत्तीस लक्षणीं वेल्हाळ ॥ मृगनयना विशाळ भाळ॥ येऊनि उभी ठाकली ॥४५॥राव निद्रेचें मिष करून॥ पलंगी पहुडलासे जाण ॥ तो न उठे ऐसें जाणोन ॥ मग कुमारी काय करी

॥ ४६ ॥ चंदनपात्र घेऊनि हातीं ॥ अलोलिका होय शिंपिती ॥ तरी जागा न होय नृपती ॥ कोणेंही प्रकारें करूनी ॥ ४७॥ ऐसी एक प्रहर झाली कष्टी ॥ जागा न होय मग झाली हिंपुटी ॥ मुक्तहार ठेवूनि खुंटी ॥ निद्रा करी सचिंत ॥ ४८ ॥ तंव निद्रा आली कामिनीसी ॥ मग राव उघडितां मुखासी ॥ विचार करी निज मानसीं ॥ मी सत्वधीर म्हणवितों ॥ ४९ ॥ परोपकारी माझें मन ॥ पापास भितों रात्रंदिन ॥ ही तंव कन्या असे जाण ॥ कैसें भाषण करावें ॥ १५० ॥ ऐसा विचार करी निजमानसीं ॥ तंव तो निद्राभर कामिनीसी ॥ मग पाहता झाला चित्रासी ॥ तेथें अपूर्व वर्तलें॥ ५१ ॥ चित्रींचा हंस निर्जीव ॥ परि तो काय करिता झाला लाघव ॥ खालीं उतरोनि सावयव ॥ हाराचीं मोत्यें भक्षितसे ॥ ५२ ॥ राव पाहूनि झाला चकित ॥ मनीं ह्मणे हे आश्चर्य मात ॥ परि ही गोष्ट अनुचित ॥ दुःख दायक आपणासी ॥ ५३ ॥ जरी हार घ्यावा काढूनी ॥ तरी ब्रीद जातसे निरसूनी ॥ परासी दुःख न द्यावें ह्मणोनी ॥ तरी ब्रीद असें माझें हें ॥ ५४ ॥ परंतु गोष्टी हे अघटित ॥ आपणास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुःख होईल प्राप्त ॥ हें ग्रहदशेचें मान सत्य ॥ परी हार न काढावा ॥ ५५ ॥ ऐसा निश्चय रायें केला ॥ इकडे सर्व हार हंसें गिळिला ॥ तें पाहून राव निजला ॥ कुमारिके शेजारीं ॥ ५६ ॥ तंव उगवला असे दिन ॥ कुमारी उठली खडबडोन ॥ ह्मणे हा पित्यानें वर आणिला जाण ॥ अतिमूर्ख नपुंसक ॥ ५७ ॥ मनीं क्रोध आला भारी ॥ उठोनी चालिली झडकरी ॥ तंव ती हार पाहे खुंटीवरी ॥ तेथें कांहीं दिसेना:॥ ॥ ५८ ॥ हार न देखे कुमारिका ॥ ती ह्मणे पांथिका अविवेका ॥ हार घेवोनी महाठका निद्रा केली सुखरूप ॥ ५९ ॥ तरी हार देई माझा झडकरी ॥ तुज पचणार नाहीं चोरी ॥ ऐसिया गोष्टीनें तुझी थोरी ॥ रहाणार नाहीं तत्वतां ॥ १६० ॥ तरी हार दे माझा मजप्रती ॥ मग त्वां जावें आपुल्या पंथीं ॥ याची चर्चा झालिया निश्चितीं ॥ नाश होईल शरिराचा ॥ ६१ ॥ तंव पांथस्थ ह्मणे कुमारिका ॥ हार नाहीं आह्मांसी ठाउका ॥ येथें निद्रा केली ह्मणोनी देखा ॥ आळ घालिसी आह्मांवरी ॥ ६२ ॥ तंव ती कुमारी संतप्त मनीं ॥ पित्यासी सांगे तत्क्षणीं ॥ ह्मणे इच्छावर आणिला मजलागुनी ॥ त्याचें लक्षण अतिउत्तम ॥ ६३ ॥ तुह्मीं ठक चोर आणिला घरा ॥ तो तस्करविद्येमाजी पुरा ॥ तेणें चोरिलें माझिया हारा ॥ तरी तो मागूनी घेईजे ॥ ६४ ॥ तेव्हां वैश्य ह्मणे पांथिकासी ॥ तुज विश्राम दिधला कासयासी॥ । तरी तूं कां हार घेऊनि बैसलासी॥ बरा झालासी उतराई ॥६५॥ उत्तम भोजन दिधलें देखा ॥ आणि ही अर्पिली निजकन्यका ॥ ऐसें असतां महामूर्खा ॥ हें काय आचरलासी ॥ ६६ ॥ बराच फेडिला उपकार ॥ देई माझे कन्येचा हार ॥ मग त्वां जावें सत्वर ॥ आलिया पंथें ॥ ६७ ॥ तंव राव ह्मणे सावकारासीं ॥ तुमचा हार नाहीं मजपाशीं ॥ हा कर्मभोग ओढवला सायासीं ॥ नसतेंच विघ्न हें ॥ ६८ ॥ तेव्हां सावकारासी क्रोध आला ॥ तेणें सेवकांसीं हुकूम केला ॥ बंधन करावें तस्कराला ॥ मार द्यावा निष्ठुरपणें ॥ ६९ ॥ यासी मारिल्यावांचून ॥ हार हस्तगत न होय जाण ॥ हा पक्का तस्कर ह्मणोन ॥ ऐसें लक्षण पैं याचें ॥ १७० ॥ मग त्या सेवकीं धांवोनि सत्वर ॥ बांधिला तो मुशाफर ॥ अतिशयें दिधला मार ॥ दया नाहीं अंतरीं ॥ ७१ ॥ ते मारिती अति

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निष्ठुर होऊनी ॥ दया नाहीं अंतःकरणीं ॥ मारा मारा ऐशा वचनीं ॥ वैश्य तव्हां बोलत ॥ ७२ ॥ मार मारून केला जर्जर ॥ ह्मणती हार देईगा सत्वर ॥ महानिर्दय निष्ठुर ॥ दया न ये कोणासी ॥ ७३ ॥ मग राव ह्मणे वैश्यासी ॥ हार नाहीं गा आह्मांपाशीं ॥ कष्टवितोसी शरीरासी ॥ वृथाचि जाण कासया ॥ ७४ ॥ तैं वैश्य ह्मणे सेवकांला ॥ हा पक्का तस्कर नव्हे भला ॥ अद्यापि नाहीं कबूल झाला ॥ मार खातो निःशंक ॥ ७५ ॥ मग तो व्यवहारी काय करी ॥ जाऊनि रायाचे दरबारीं ॥ राया चंद्रसेना श्रुत करी ॥ सांगे सकळ वर्तमान ॥ ७६ ॥ तें ऐकोनि राजेश्वर ॥ ह्मणे आणावा तो तस्कर ॥ ऐसें ऐकोनि सत्वर ॥ सेवकांची मांदी धांवली ॥ ७७ ॥ त्यांनीं बंधन करोनि विक्रमासी ॥ आणिते झाले रायापाशीं ॥ मग प्रणिपात केला वेगेंसीं ॥ सन्मुख उभा राहिला ॥७८ ॥ मग राव बोले पांथिकासी ॥ हार आहे कीं तुजपासीं ॥ तो देई आतां सावकारासी ॥ प्राण वांचवीं आपुला ॥ ७९ ॥ तंव विक्रम बोले वचना ॥ ऐक राया चंद्रसेना ॥ हार वेतला नाहीं जाणा ॥ असत्य न बोले कदाही

॥ १८० ॥ हाराचा सांगावा विचार ॥ तरी वृथा ह्मणाल तुह्मी सर्वत्र ॥ न घडे तोचि विचार ॥ घडला असे समर्था ॥ ८१ ॥ आह्मांसी ग्रह नाहीं सानुकूळ ॥ नसती उत्पन्न होते कळ ॥ त्याची काय करून हळहळ ॥ होणार तें होतसे ॥ ८२ ॥ बरें चोरी न करावी परंतु केली ॥ परी आतां पाहिजे क्षमा केली ॥ सर्व अपराध पोटीं घाली ॥ कृपा करीं महाराजा ॥ ८३ ॥ ऐसें वचन ऐकतां राजेश्वर ॥ क्रोधें संतप्त जैसा खदिरांगार ॥ गर्जना करोनि सत्वर ॥ काय बोलता जाहला ॥ ८४ ॥ सेवकांसी ह्मणे उठा सत्वर ॥ तोडा याचे चरण कर ॥ टाकून द्या नगराबाहेर ॥ अन्न उदक न द्यावें ॥८५॥ ऐसा रायाचा अविवेक ॥ मूढमती ते सकळिक ॥ नाहीं कोणीही भाविक ॥ यथा राजा तथा प्रजा ॥ ८६ ॥ तरी रायाचे मुखीं शनैश्चर ॥ सुचूं न दे कांहीं विचार ॥ तोचि पिडा करी वारंवार ॥ दुःख देत रायातें ॥ ८७ ॥ असें चंद्रसेनाचें उत्तर ऐकोनि ॥ सेवक उठले झडकरोनि ॥ रायाविक्रमासी चालिले घेऊनी ॥ तया नगराबाहेर ॥ ८८ ॥ नेऊनियां नगरप्रदेशीं ॥ तोडिते झाले करचरणांसीं ॥ अश्रु येती जनांच्या नयनासी ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

महासंकट वोढवले ॥ ८९ ॥ तेव्हां हात पाय चारी ॥ तोडिले तेव्हां निष्ठुरीं ॥ टा-
कोनी ग्रामाबाहेरी ॥ सेवक गेले सांगावया ॥ १९० ॥ मग राजा पुसे सेवकांला ॥ तो
मेंला किंवा वांचला ॥ त्याचा प्राण कोठें उरला ॥ ऐसें बोलें उत्तर ॥ ९१ ॥ मग सेवक
ह्मणती महाराज ॥ सत्वरचि प्राण जाईल सहज ॥ करचरणाविण आत्मराज ॥ कैसें
सुख पावेल ॥ ९२ ॥ खाण्याविण हैराण ॥ शरीरीं पीडा अति दारुण ॥ तळमळ करी
रात्रंदिन ॥ महा दुःख होतसे ॥ ९३ ॥ इकडे राजा विक्रम काय करी ॥ हातपायांचें
दुःख भारी ॥ जैसा मत्स्य तळमळ करी ॥ उदकाविण जाण पां ॥९४॥ कोणी येताती
वाटसरू ॥ त्यांसी पाहतां येत गहिंवरू ॥ ते ह्मणती हे परमेश्वरू ॥ कोण कष्ट या
प्राणियासी ॥ ९५ ॥ जरी अन्न उदक कोणी द्यावें ॥ तरी रायें त्यासी दंडावें ॥ ताडन
बंधन करावें ॥ ऐसा धाक जनांसी ॥ ९६ ॥ ऐसें असतां झाला एक मास ॥ अति
दुःख होतसे विक्रमास ॥ परी दया न ये कोणास ॥ ग्रहदशा ह्मणोनी ॥ ९७ ॥ राव
विक्रम शोक करी ॥ म्हणे ग्रहा समर्था कृपा करी ॥ निष्ठुर न व्हावें निजांतरीं॥दया क-

रीं दीनास ॥ ९८ ॥ ऐसी करुणा भाकितां तयेवेळीं ॥ मग शनैश्चरासी कृपा आली॥
ह्मणे याच्या सत्वाची न कळे खोली ॥ सीमा झाली तत्वतां ॥ ९९ ॥ तरी पीडूं नये
तत्वतां ॥ केली रायाच्या मनीं प्रेरकता ॥ चंद्रसेन द्रवला चित्ता॥ह्मणे अन्न उदक देत
जावें ॥ २०० ॥ अन्नउदकाची आज्ञा जाहली ॥ नगर जनांसी दया आली ॥ ते आणो-
नि देती नित्यकाळीं ॥ कनवाळु कृपाळु जन ॥ १ ॥ अन्नउदकाचा होतसे सुकाळ ॥
परंतु करचरणाविण पांगुळ ॥ त्या अतिदुःखें होतसे विकळ ॥ चैन न पडे क्षणभरी
॥ २ ॥ ऐशीं क्रमिलीं वर्षें दोन ॥ तोंवरी दुःख सोशिलें दारुण ॥ ऐसें कर्माचें
विंदान ॥ भोगिल्याविण ॥ सुटेना ॥ ३ ॥ तंव कोणे एके दिवशीं ॥ तेलीण बैसोनि
शिबिकेसी ॥ जात होती सासऱ्यासी ॥ तया मार्गानें ॥ ४ ॥ त्या तेलणीचें माहेर ॥
होतें उज्जनी नगर ॥ सासरें तामलिंदापूर नगर ॥ ऐसें श्रोतीं जाणावें ॥ ५ ॥ तेथील
तेलियानें उज्जनीहुनी ॥ स्नुषा आणिली मूळ करोनी ॥ तंव तीं त्या मार्गावरोनी ॥
येत होती उभयतां ॥ ६ ॥ तेव्हां त्या तेलिणीनें ॥ पाहिलें विक्रमाकारणें ॥ मनीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणे राजा कोणें ॥ आणिलासे या स्थानीं ॥ ७ ॥ मग ती खालीं उतरोनि कामिनी ॥ लागली विक्रमाच्या चरणीं ॥ ह्मणे हातां पायांवांचोनी ॥ कोण अवस्था शरीराची ॥ ८ ॥ राजा अवलोकी तेलणीकडे ॥ बाई विजयी अभोत तुझे चुडे ॥ काय वृत्तांत ग्रामाकडे तो सर्व सांग मज ॥ ९ ॥ मग कामिनी ह्मणे अहो राया ॥ सर्व सुखी आहेत करुणालया ॥ परी हे अवस्था तुमच्या देहा ॥ काय ह्मणोनी जाहली ॥ २१० ॥ राव ह्मणे ऐक पतिव्रते ॥ हा कर्मभोग जाण निश्चितें ॥ ग्रहदशा फिरली मातें ॥ हें कर्तृत्व देवाचें ॥ ११ ॥ मग सर्व सांगितलें तियेसी ॥ जें जें वर्तलें ज्या समयासी ॥ तें ऐकोनि ह्मणे विक्रमासी ॥ धन्यरे विधातिया ॥ १२ ॥ मग ती तेलीण काय करीत ॥ रायासी शिबिकेमाजी बैसवित ॥ आपुल्या गृहासी घेऊनि जात ॥ अत्यादरें करोनियां ॥ १३ ॥ तंव तो तेली कांपे थरथरा ॥ ह्मणे हें विघ्न आणिलें घरा ॥ जरी श्रुत होईल राजेश्वरा ॥ मग कैसें करावें आपण ॥ १४ ॥ तेव्हां सून ह्मणे श्वशुरासी ॥ हा विक्रमादित्य निश्चयेंसी ॥ धर्मनीतीं राज्य करी उज्जनीसी ॥

परी हे दशा ग्रहाची ॥ १५ ॥ हा माळवा देशींचा धनी ॥ जैसा उकिरड्यांत पडिला चिंतामणी ॥ दैवें लाधला आपणालागुनी ॥ ह्मणोनी आला गृहातें ॥१६॥ मग तो तेली काय करी ॥ राया चंद्रसेना श्रुत करी ॥ आपण तस्कर टाकिला जो बाहेरी ॥ हस्तपाद खंडोनी ॥१७॥ जरी आज्ञा होईल राजेश्वरा ॥ तरी आणीन तया तस्करा ॥ दया उपजली मम अंतरा ॥ दीन अनाथ ह्मणवोनी ॥ १८ ॥ मग राव ह्मणें भलारे भला ॥ आणावें तया तस्कराला ॥ प्रतिपाळ करीं वहिला ॥ अन्नवस्त्र देऊनी ॥ १९ ॥ ऐसा हुकूम केला रायानें ॥ मग तेली आला घराकारणें ॥ तेव्हां तेलियासी विक्रम ह्मणे ॥ गोष्ट सांगतों ऐका ते ॥ २२० ॥ मग राव ह्मणे मेहेतरासी ॥ तुह्मीं श्रुत न करावें कोणासी ॥ विक्रम आहे मम गृहासी ॥ ऐसें कोठें न वदावें ॥ २१ ॥ मग तो तेली ह्मणे राजेश्वरा ॥ घाणा हाकावा माझिया घरा ॥ देईन मी अन्न आणि वस्त्रा ॥ ऐसा नेम पैं माझा ॥ २२ ॥ मग विक्रम ह्मणे तया तेलियासी ॥ धन्य तुझी बुद्धि ऐसी ॥ तुझा उपकार न फिटे आह्मांसी ॥ महत्संकटीं रक्षिलें ॥ २३ ॥ ऐसें करितां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कांहीं एक दिवस ॥ होते झाले विक्रमास ॥ तया तेलियाचे घरीं रात्रंदिवस ॥ घाणा हांकीतसे ॥ २४ ॥ तंव सातवर्षें परिपूर्ण झालीं ॥ पुढें कथा कैशी वर्तली ॥ ती पाहिजे श्रवण केली ॥ एकाग्र चित्तें करोनी ॥२५॥ मग कोणेंएके दिवशीं ॥ सायंकाळ जाहली निशी ॥ घाण्यावर असतां विक्रमासी ॥ बुद्धि कैसी आठवली ॥ २६ ॥ तो दीपरागाचा अवसर ॥ ध्यानांत आणि राजेश्वर॥ राग आळवीतसे मधुर ॥सुस्वर कंठें करोनी ॥२७॥ रागउद्धार करितां प्रत्यक्ष ॥ दीप लागले लक्षानुलक्ष ॥ जैसी दिपवाळीच देख ॥ प्रकाशमान नगरांत ॥ २८ ॥ तंव एकस्तंभाच्या माडींत ॥ राजकन्या अतिरूपवंत ॥ नामें पद्मसेना निश्चित ॥ बैसलीसे आनंदें ॥ २९ ॥ तेव्हां तिनें अवलोकिला प्रकाश ॥ मग पाचारिलें परिचारिकेस ॥ ह्मणे कोणें केलें दीपोत्सवास ॥ शोध करोनी मज सांगा ॥ २३० ॥ दिपवाळी तो आज नाहीं ॥ आणि लग्नही नसे कोठेंही। तरी हें आश्चर्य दिसतें कांहीं ॥ पाहूनि यावें सत्वर ॥ ३१ ॥ इकडे दीपराग झाला संपूर्ण ॥ तेव्हां दीप मावळले मुळींहून ॥ मग दुसरा श्रीराग नामें करून ॥. तेथें राग आळवीतसे

॥ ३२ ॥ पद्मसेना पुसे परिचारिकेसी ॥ हा पुरुष रागज्ञानी विशेषीं ॥ राग आळवितो अतिसुरसीं ॥ कोण्यास्थळीं पहागे ॥ ३३ ॥ याचा आणावा समाचार ॥ धुंडाळावें सकळ नगर ॥ जेथें असेल तो नर ॥ येथें आणा वेगेंसीं ॥ ३४ ॥ तेव्हां परिचारिका चौघीजणी ॥ नगरीं शोध करिती तत्क्षणीं ॥ तंव तो तेलियाच्या घरीं घाणी ॥ हांकीतसे चौरंगा ॥ ३५॥ त्या परतोनि राजकन्येसी सांगती ॥ कीं चौरंगा केला जो निश्चिती ॥ तो तस्कर तेलियाच्या गृहाप्रती ॥ घाणा हांकीत बैसला ॥ ३६ ॥ तोची करीत आहे रागरंग ॥ परी स्वरूप दिसताहे बेढंग ॥ जैसें कां शिमग्याचें सोंग ॥ ऐसियापरी दिसताहे ॥ ३७ ॥ मग पद्मसेना ह्मणे साचार ॥ तरी घेऊनी या तो तस्कर ॥ जीवेंभावें करीन भ्रतार ॥ वेध लागला अंतरीं ॥ ३८ ॥ परिचारिका ह्मणती प्रमाण ॥ परी राया श्रुत करावें जाण ॥ ह्मणजे न लागे दूषण ॥ शद्ध न ये आह्मांवरी ॥ ३९ ॥ तेव्हां पद्मसेना ह्मणे तुह्मांस कायी ॥ तयासी येथें आणावें पाहीं ॥ मग रायासी श्रुत करीन लवलाहीं ॥ तुह्मी मनीं भिऊं नका ॥ २४० ॥ तेव्हां परिचारिका निघाल्या तेथुनी ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

येत्या झाल्या तेल्याचें दुकानीं ॥ मग त्या तेलियासी पुसोनी ॥ तयासी घेऊनि चालिल्या ॥ ४१ ॥ एकस्तंभाच्या माडीवरी ॥ तयासी नेलें पैं सत्वरीं ॥ मग त्यातें अवलोकून राजकुमारी ॥ अंतरीं संतोषली ॥ ४२ ॥ मग ते वदे चौरंगासी ॥ तुह्मी रागज्ञानी अतिविशेषीं ॥ तरी आतां रागोद्धार ॥ करावा वेगेंसीं ॥ जेणें तृप्त होती श्रवण हे॥४३॥ मग तो करी रागोद्धार ॥ यथा न्याय गातसे सुस्वर ॥ कंठ त्याचा अतिमधुर ॥ जैसा गंधर्व दुसरा ॥ ४४ ॥ ऐसा राजकन्येच्या माडीवर ॥ रागरंग होतसे अपार ॥ तंव चंद्रसेन आपुल्या माडीवर ॥ ऐकता जाहला ॥४५॥ मग राव पुसे परिचारिकेसी ॥ आजि कुमारिकेच्या महालासी ॥ रंग होतो दिवसनिशी ॥ कोणे कार्यासीसांग पां ॥ ४६ ॥ मग दासी ह्मणती समर्था ॥ हा अन्याय आह्मांसी लाविता ॥ परी हे निजकन्येची अवस्था ॥ आह्मांकडे काय शब्द ॥ ४७ ॥ परंतु आमुची एक विनवणी ॥ येऊनि पहावें निजनयनीं ॥ मग येईल कळोनी ॥ अवस्था तेथील ॥४८॥ पद्मसेनेचा विचार ॥ आह्मां सांगतां नये साचार ॥ ह्मणोनि तेथें चलावें सत्वर ॥ मग जें करणें तें करावें ॥४९॥

तंव त्या रायासी निद्रा आली ॥ पुढें कथा कैसी वर्तली ॥ ती पाहिजे श्रवण केली ॥ एकाग्रचित्तें करोनियां॥२५०॥राजाविक्रम त्या माडीवर॥बैसलासे चिंतातुर॥तंव साडेसात वर्षें साचार ॥ भरलीं शनिदेवाचीं ॥ ५१ ॥ राजा मनीं चिंता करीत ॥ ह्मणे केव्हां उज्जनी होईल प्राप्त ॥ क्लेश भोगिले अत्यंत॥परी कृपा न करी ग्रहस्वामी ॥५२॥ ऐसा राव चिंता करीत ॥ तंव तेथें काय वर्तली मात ॥ शनि देव होऊनि कृपावंत ॥ सन्मुख उभा ठाकला ॥ ५३ ॥ ह्मणे ऐक राया विक्रमसेना ॥ मज न ओळखसी अज्ञाना ॥ अद्यापि अनुभव तव मना॥ आला किंवा नाहीं ॥ ५४ ॥ मग राव उठूं पाहे झडकरोन ॥ परी ते नाहींत करचरण ॥ तेव्हां तैसाची भूमीशयन ॥ लोटांगण घालितसे ॥ ५५ ॥ तेव्हां शनिदेव ह्मणे राया विक्रमा ॥ धन्य धन्य तुझा महिमा ॥ आतां मी प्रसन्न राजोत्तमा ॥ इच्छा असेल तें माग ॥ ५६ ॥ तंव विक्रम बोले सद्गद वचन ॥ ह्मणे मनुष्यदेहा न पीडीं जाण ॥ हेंचि द्यावें मज दान ॥ कृपाळुवा शनिदेवा ॥ ५७ ॥ म्यां दुःख सोशिलें अनिवार ॥ ऐसें प्राण्यासी नाहीं सोसणार ॥ तरी तूं कोणासी न पीडीं साचार ॥ हेंचि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मागणे शनिदेवा ॥ ५८ ॥ ऐसें ऐकोनि शनिदेव ॥ ह्मणे धन्य धन्य तूं विक्रमराव ॥ परपीडेचा अनुभव ॥ जाणतोसि निजांतरीं ॥ ५९ ॥ तूं न मागसी हात पाय ॥ राज-छत्रादि सुखोपाय ॥ तरी तुज ईश्वर ह्मणो ये ॥ परदुःख निवारसी ॥ २६० ॥ मग कृपा उपजली शनिदेवासी ॥ राव करचरणादि रूपासी ॥ पहिल्याहूनि अतिविशेषीं ॥ सुंदर काया पैं केली ॥ ६१ ॥ मग राव शनिदेवाचेचरण धरी ॥ ह्मणे कृपाळूवा कृपा करीं ॥ हेंचि मागणें साचारीं ॥ न करीं पीडा कोणासी ॥ ६२ ॥ मग रायातें शनिदेव बोले ॥ म्यां काय तुज दुःख दिधलें ॥ दुःख गुरुनाथें पाहिलें ॥ ते कष्ट कोणे रीतो ॥ ६३ ॥ तुज दुःख दाविलें किंचित ॥ म्या कैसे त्रासिले देव दैत्य ॥ तें श्रवण करीं निश्चित ॥ गुरुपीडा अवधारीं ॥ ६४ ॥ एके दिवशीं प्रातःकाळीं ॥ नमन केलें गुरुमा-उली ॥ मग हस्त जोडोनि ते वेळीं ॥ विनंति करीं तयासी ॥ ६५ ॥ अहो जी श्रीगुरु-नाथा ॥ मी तुमच्या राशीस येतों आतां ॥ तरी मान्य करीं कृपावंता ॥ साडेसात वर्षांत ॥ ६६ ॥ मग गुरु ह्मणे गा मजसी ॥ तुह्मीं कृपा करावी आह्मांसी न यावें आमुच्या राशीशी ॥ घडी एक जाण पां ॥ ६७ ॥ मग मी वदलों तें वेळां ॥ तुह्मीं क-रितां माझा कंटाळा ॥ तरी मज थारा नाहीं दयाळा ॥ कोणी न करती मान्य मज ॥६८॥ तरी पांच वर्षें मान्य करीं ॥ अथवा अडीच वर्षें पदरीं धरीं ॥ अडीच वर्षांची परी ॥ थोडकीच असे ॥६९॥ परी ते न मानीच गुरु ॥ मग मी ह्मणे न घडे निर्धारु ॥ पुन्हां मनीं केला विचारु ॥ कीं गुरूसी न गांजावें ॥ २७० ॥ गुरु केवळ माऊली सदा कृपेची साऊली ॥ गुरुवचन न मानितां ये वेळीं ॥ अधःपात प्राप्त होय ॥ ७१ ॥ ते वेळां मी लागलों चरणीं ॥ विनंती करीत विनीतवचनीं ॥ मी प्रसन्न तुज ग्रह शनी ॥ माग माग गुरुनाथा ॥ ७२ ॥ तेव्हां गुरु ह्मणे शनैश्चरा ॥ आह्मांवरी कृपा करा ॥ न यावें आमुच्या शरीरा ॥ हेंचि आतां मागतसें ॥७३॥ मग मी प्रसन्न जाहलों ते क्षणीं ॥ साडेसात प्रहर येतों ह्मणोनी ॥ तुह्मीं मान्य न केल्या सर्व प्राणी ॥ न मानिती मज-लागीं ॥ ७४ ॥ मग गुरुदेव ह्मणे प्रमाण ॥ तरी सवा प्रहर येणें जाण ॥ तें म्यां मान्य केलें वचन ॥ मग आज्ञा दिधली गुरूनें ॥ ७५ ॥ गुरु विचार करी निजमानसीं ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्नान संध्यादि स्वकर्मासी ॥ करितां दवडीन सवा प्रहरासी ॥ मग तो शनि काय करील ॥ ७६ ॥ ऐसा गर्व धरिला मनांत ॥ तो मज कळला वृत्तांत ॥ मग म्यां विचारिलें चित्तांत ॥ कांहीं चमत्कार दाखवूं ॥ ७७ ॥ तंव ते आली ग्रहाची वेळ ॥ तेव्हां गुरु जाहला उतावेळ ॥ ह्मणे मृत्युलोकीं गंगाजळ ॥ तरी स्नानालागीं पैं जावें ॥ ७८ ॥ शनिग्रहाची पडतां छाया ॥ तेव्हां पालटली गुरुकाया ॥ मग फकीरवेषें तया ठाया ॥ शनैश्चर पातला ॥ ७९ ॥ तयापासीं खरबुजें होतीं दोन ॥ तीं केलीं गुरूसी अर्पण ॥ मग गुरु हर्षयुक्त होऊन ॥ दोन पैसे देत तया ॥ २८० ॥ मग स्नान करोनि ते वेळीं ॥ धोत्रांत फळें बांधिलीं ॥ झारी शोभे करकमळीं ॥ चालिले ते मार्गानें ॥ ८१ ॥ तंव पुढें दिसे एक नगरी ॥ तेथें काय झाली परी ॥ राव प्रधान समसरीं ॥ दोन पुत्र दोघांसी ॥ ॥ ८१ ॥ ते उभयतां त्या दिवशीं ॥ गेले होते शिकारीसी ॥ दोन प्रहर झाले तयांसी ॥ वाट पाहे राजेंद्र ॥ ८३ ॥ तंव ते येतां दिसेना ॥ इकडे उशीर जाहला भोजना ॥ तेव्हां सेवकास केली आज्ञा ॥ धुंडूनि आणा दोघांसी ॥ ८४ ॥ मग ते सेवक निघाले सत्वर ॥

लगबगां आले गांवाबाहेर ॥ तंव तो पुढें देखिला विप्र ॥ हातीं झोळी खरबुजांची॥८५॥ तंव शनेश्वरें केली माव ॥ फळांचीं मस्तकें जाहलीं सावयव ॥ सेवकीं ओळखिला ब्रह्मदेव ॥ ह्मणती तुह्मांपासीं काय आहे ॥ ८६ ॥ ब्राह्मण ह्मणे सेवकांसी ॥ खर्बुजें घेतलीं फराळासी ॥ सेवक ह्मणती रुधिरासी ॥ स्वाद होतो दिसताहे ॥ ८७ ॥ तूं ब्राह्मण किंवा शूद्र ॥ वस्त्रांतून गळे रुधिर ॥ काय आहे तें सत्वर ॥ दाविजे पैं आह्मांसी ॥ ८८ ॥ मग गुरु झाला भयभीत ॥ ह्मणें हें अघटित काय वदत ॥ अधोदृष्टीं झोळी पहात ॥ तंव तें रुधिर प्रत्यक्ष ॥ ८९ ॥ सेवक झोळी घेती हिरोन ॥ मग ते पाहती सोडोन ॥ तंव शिरकमळें निघालीं दोन ॥ प्रधानराजपुत्रांचीं ॥ २९० ॥ सेवक ह्मणती रे चांडाळ्या ॥ महादुष्टा पतिता खळा ॥ ब्रह्मवंशीं अमंगळा ॥ दया नाहीं तुज अंतरीं ॥ ९१ ॥ मग ते क्रोधयुक्त मानसीं ॥ बंधन करिती ब्राह्मणासी ॥ मारीत मारीत तथासी ॥ रायापासी आणिला ॥ ९२ ॥ रायासन्मुख उभा करून ॥ सेवक सांगती वर्तमान ॥ हा बाळहत्यारी ब्राह्मण ॥ यानें उभयतांसी मारिले ॥ ९३ ॥ ऐकतांचि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रायासी आली मूर्च्छना ॥ मनीं ह्मणे कैसें केलें नारायणा ॥ एक पुत्र होता तोही मना ॥ नाहीं आला तुझ्या कीं ॥९४॥ ब्राह्मण नोहे हा काळ ॥ यानें गिळिला माझा बाळ ॥ तरी यासी नेऊनी तत्काळ ॥ सुळावरी देईंजे ॥ ९५ ॥ ऐसा हुकुम होतां रायाचा ॥ शूल करविला लोखंडाचा ॥ नेऊनि रोंविला पैं साचा ॥ नगराबाहेरी ॥ ॥ ९६ ॥ तंव भृगूचिया मंदिरांत ॥ वर्तमान झालें श्रुत ॥ तेव्हां एकचि वर्तला आकांत ॥ तो लिहितां ग्रंथ विस्तारेल ॥ ९७ ॥ परी राजपुत्राची कामिनी ॥ पतिव्रता लावण्यखाणी ॥ वार्ता ऐकतां तत्क्षणीं ॥ सती जावया सिद्ध जाहली ॥ ९८ ॥ आतां इकडे गुरुनाथासी ॥ घेऊनि गेले शूळापासीं ॥ तेव्हां न सुचे कांहीं गुरुसी ॥ ग्रहदशेनें वेष्टिला ॥ ९९ ॥ मग गुरु वदे सेवकांला ॥ आतां सुळीं न द्यावें आह्मांला ॥ दहा सहस्र रुपये तुह्मांला ॥ देतों क्षणभरी थांबावें ॥ ३०० ॥ दोन घटिका आह्मांसी ॥ सुळीं न द्यावें निश्चयेंसी ॥ मग अवलोकावें नेत्रेंसी ॥ कैसें होईल तें ॥ १ ॥ ऐसे करुणाशब्द बोलतां तयां ॥ मग त्यां सेवकांसी आली दया ॥ तेव्हां ते ह्मणती दोन घटिका

थांबोनियां ॥ मग देऊं सुळावरी ॥ २ ॥ ऐसें बोलतां बोलतां जाण ॥ सवाप्रहर झाला परिपूर्ण ॥ प्रधानराजपुत्र दोघेजण ॥ आले वारूसहित ॥३॥ जेणें रायासी जाणविलें ॥ त्याचें दरिद्र दूर केलें ॥ मग सेवकांसी आज्ञापिलें सुळी न द्यावें ब्राह्मणा ॥ ४ ॥ तेव्हां सेवक धांवले सत्वर ॥ येऊनि नगराबाहेर ॥ सांगितला समाचार ॥ सुळीं न द्यावें ब्राम्हणा ॥ ५ ॥ मग तो आणिला रायापाशीं ॥ उभा राहिला सन्मुखेंसी ॥ आशीर्वाद देऊनियां रायासी ॥ आपुला वृत्तांत निवेदिला ॥ ६ ॥ ऐकोनि राव झाला सद्गदित ॥ म्हणे मज नव्हतें विदित ॥ दूषण लावोनि वधित ॥ होतां तुम्हां गुरुराया ॥ ७ ॥ धिग्र धिग्र हा संसार ॥ मी महापापी अनिवार ॥ केवढा केला अविचार ॥ राजमदेंकरोनी ॥ ८ ॥ तेव्हां सद्गदित झाला नृपती ॥ गुरुचरण धरिलें प्रीतीं ॥ स्फुंदस्फुदोनि रडे निश्चितीं ॥ मी अपराधी गुरुराया ॥ ९ ॥ नेणतपणें जाहला अविचार ॥ तो क्षमा करीं सत्वर ॥ मग हात धरोनी सत्वर ॥ सिंहासनीं बैसविला ॥ ३१० ॥ मग गुरु म्हणे ऐक भूपाळा ॥ हा अन्याय नाहीं तुजला ॥ ही शनैश्चराची कळा ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुःख दाविलें तयानें ॥११॥ मग झोळी आणोनि पाहती ॥ तंव तीं खर्बुजेंच दिसती ॥ शिरकमळांची आकृती ॥ अदृश्य जाहली तत्काळ ॥ १२ ॥ असो राये करविलें भोजन ॥ गुरुपंक्तीस बैसला आपण ॥ आणखीही दिव्य ब्राह्मण ॥ सर्वही तृप्ति पावले ॥ १३ ॥ मग गुरुसी वस्त्रें भूषणें ॥ दीधलीं राया भृगूनें ॥ तेव्हां आज्ञा घेऊनि गुरुनें ॥ प्रयाण कलें तेथोनी ॥ १४ ॥ मग शनिदेव आले गुरुपाशीं ॥ नमन केलें साष्टांगेंसी ॥ ह्मणे वर्तणुक जाहली कैसी ॥ ती सांगावी गुरुनाथा ॥ १५ ॥ गुरु ह्मणे बापा शनैश्चरा ॥ सवा प्रहरांत केला माझा मातेरा ॥ साडेसात वर्षें येतासि खरा ॥ तरी मग काय होतें कळेना ॥ १६ ॥ तूं ग्रहांमाजी ग्रह श्रेष्ठ ॥ जीवासि देसी बहु कष्ट ॥ मी गुरु तुज अति श्रेष्ठ ॥ बरा उपकार फेडिला ॥ १७ ॥ असो जें जाहलें तें बरें झालें ॥ परी ऐसें कोणा न कष्टवी वहिलें ॥ तुज शपथ माझी ये वेळे ॥ शनिग्रहा समर्था॥१८॥ मग शनिदेव ह्मणे गुरुसी ॥ गर्व न धरावा मानसी ॥ गर्व धरील त्या पुरुषासी॥ ऐसेंच मी गांजीन ॥ १९ ॥ गुरुजी तुह्मांस गर्व जाहला ॥ ह्मणोनि हा अपराध घडला ॥तरी क्षमा

करा बाळकाला ॥ अपराध पोटीं घालिजे ॥ ३२० ॥ मग शनि गेला शिवापाशीं ॥ ह्मणे आतां येतों मी तुह्मांसी ॥ तंव शंभु ह्मणे आह्मांसी ॥ काय करिसी येऊनी ॥ २१ ॥ परी येसील तेव्हां सांगून येणें ॥ ऐसें उभयतां झालें बोलणें ॥ मग दुसरे दिवशीं शनीनें॥येतों ह्मणोन सुचविलें ॥ २२ ॥ शंकरें ऐकोनि वचनासी ॥क्षण एक लपाला कैलासीं ॥ मग वदता झाला शनीसी ॥ तुवां आमुचें काय केलें ॥ २३ ॥ मग शनि ह्मणे महादेवा ॥ तुमचा धाक त्रिभुवनीं सर्वां ॥ मजा भेणें लपालेती देवाधिदेवा ॥ हें काय थोडें असें॥२४॥ ऐकोनि हास्य करी कैलासराज ॥ ह्मणे धन्य तुझें उग्रतेज ॥ मग त्यानें कृपा करून सहज ॥ आज्ञा देत शनीला ॥ २५ ॥ मग ग्रह आला रामचंद्रासी ॥ वनवास भोगविला तयासी ॥ आणि ग्रह येतां सीतेसी ॥ रावणें चोरून पैं नेलें ॥ २६ ॥ रावणाच्या मंचकाखालते ॥ नवग्रह होते पालथे ॥ त्यांवरी मंचक ठेवूनि निरुतें ॥ रावण पहुडे नित्यकाळीं ॥ २७ ॥ तंव तेथें आले नारदमुनी ॥ ते वदते झाले मजलागुनी॥ तूं ग्रहश्रेष्ठ महाअभिमानी ॥ ऐसी दशा तुमची ॥ २८ ॥ तरी येथें तुमचें कांहीं नचाले ॥ गरिबां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सी कष्टवितां बळें ॥ हें सामर्थ्य नव्हे आगळें ॥ उगाचि पुरुषार्थे भोगितां ॥ २९ ॥
मग शनि वदे नारदासी ॥ आह्मां पालथे ते सोईचे करविसी ॥ मग पाहें पराक्रमासी ॥
कैसा आहे तो दावीन ॥३३०॥ नारद ह्मणे मी ऐसें करीन ॥ ऐसें बोलोनियां वचन ॥
मग गवणासी जाऊन ॥ सांगे तयासी विचार ॥ ३१ ॥ ह्मणे ग्रह पालथे घालून ॥
मंचकीं निद्रा करिसी रात्रंदिन ॥ तरी हें अनुचित असे जाण ॥ वैरियाच्या उगवसी
पाय द्यावा ॥३२॥ तें वचन रावणा मानलें ॥ मग पालथे ते सोईचे केले ॥ मग तेथें
काय वर्तलें ॥ तें परिसावें सज्जनीं ॥ ३३ ॥ दृष्टि फिरवितां शनैश्चर ॥ षण्मासांत सहप-
रिवार ॥ निर्दाळी श्रीरामचंद्र ॥ पुत्रपौत्रांसहित ॥ ३४ ॥ हरिश्चंद्रासी आला शनी ॥
वागवा अतिकरस्थानीं ॥ पिडिता झाला कौशिकमुनी ॥ राज्यभ्रष्ट तो केला ॥ ३५ ॥
पुढें अति दुःख दिधलें तयासी ॥ स्त्रीपुत्रादि वातले विक्रयासी ॥ सवें विकला डोंबासी ॥
तेथेंही जाचिलें बहुत ॥ ३६ ॥ ऐसें कष्टविलें गजोत्तमा ॥ दमयंती प्राणमनोरमा ॥ दुःख
दिधलें हे विक्रमोत्तमा ॥ पीडियेली दमयंती ॥ ३७ ॥ ग्रह आला इंद्रशया ॥ भोगिली

गौतमाची जाया ॥ भगांकित झाली सर्व काया ॥ ऋषिशापें करोनियां ॥ ३८ ॥
ग्रह आला चंद्रासी ॥ स्पर्श केला गुरुपत्नीसी ॥ कलंक लागला चंद्रासी ॥ ऐसें झालें जाणपां
॥ ३९ ॥ ग्रह आला वसिष्ठाशी ॥ क्षय झाला शतपुत्रांशी ॥ तैसेंच पीडिलें पराशरासी
मत्स्यगंधा भोगिली ॥ ३४० ॥ पांडव ग्रहदशा भोगित ॥ राज्य हरोनि गेले वनांत ॥
कौरवांचा क्षय केला क्षणांत ॥ ग्रह येतांच तत्काळीं ॥ ४१ ॥ तैसाचि श्रीकृष्णासी
ग्रह आला ॥ स्यमंतकाचा डाग लागला ॥ तो कोणत्या कारणें निघाला ॥ हरिविजयीं
ती कथा ॥ ४२ ॥ मग कृष्ण ह्मणे शनैश्चरा ॥ तूं महासमर्थ होसी खरा ॥ सर्वत्रांसी
तुझा दरारा ॥ देवदानवादिकांसी ॥ ४३ ॥ ऐसें देवांदिकांसी त्रासविलें ॥ त्यांत तुजला
कांहींसें दुःख दिधलें ॥ किंचित् चमत्कारासी दाविलें ॥ समजावया तुजलागीं ॥ ४४ ॥
मग विक्रम उठे झडकरी ॥ साष्टांग नमस्कार करी ॥ धन्य शनैश्चरा अवधारीं ॥ पावन
केलें मजलागीं ॥ ४५ ॥ आतां मी तुज अनन्य शरण ॥ कृपा करी अनाथालागुन ॥
हेंचि द्यावें वरदान ॥ न पीडीं प्राणीमात्रासी ॥ ४६ ॥ मग शनि ह्मणे विक्रमासी ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धन्य तूं परोपकारी होसी ॥ परपीडा निवारितोसी ॥ उपमा नाहीं तुजलागीं ॥ ४७ ॥
तेव्हां प्रसन्न झाला शनैश्चर ॥ रायासी देता झाला निजवर ॥ हा ग्रंथ श्रवण पठण करी
जो नर ॥ तयासी पीडा न करीं मी ॥ ४८ ॥ भावें करिती श्रवण पठण ॥ आदरें ग्रंथ
संरक्षण ॥ त्यांसी रक्षीं मी रात्रंदिन ॥ कृपा करीन सर्वथा ॥ ४९ ॥ जो कां श्रवण पठण
न करी ॥ आणि ग्रंथाची हेळणा करी ॥ तया नराच्या शरीरीं ॥ पीडा फार करीन
मी ॥ ३५० ॥ श्रवण पठणाचा ऐका विचार ॥ नित्य अथवा शनिवार ॥ श्रवण
करी जो नर ॥ उपोषणें अतिसंतोषें ॥ ५१ ॥ जरी न करवे उपोषणासी ॥ तरी श्रवण
करावें अहर्निशीं ॥ तेणें संतोष मम मानसीं ॥ मग पीडा न करी तत्त्वतां ॥ ५२ ॥
वचन माझें नेमस्त ॥ विक्रमासी भाष देत ॥ त्या नरासी मी भाग्यवंत ॥ करीन जाण
निर्धारें ॥ ५३ ॥ ऐसा वर देऊनि रायाशी ॥ शनिदेव गेले निजस्थानाशीं ॥ पुढें कथा
वर्तली कैशी ॥ ती श्रवण करावी श्रोते हो ॥ ५४ ॥ राजकन्येच्या माडीवर ॥ विक्रमासी
भेटले शनैश्चर ॥ तेव्हां रायाचें दिव्य झालें शरीर ॥ जैसा सूर्य प्रगटला ॥ ५५ ॥ तंव

चंद्रसेन राव आला ॥ पाहे तंव देखे विक्रमाला ॥ जैसा मदनाचा पुतळा ॥ तटस्थ झाला
मानसीं ॥ ५६ ॥ मग ती पद्मसेना राजकुमारी ॥ राया विक्रमातें वरी ॥ राव पुसे ते
अवसरीं ॥ आपण कोण महाराजा ॥ ५७ ॥ विक्रम वदे साचार ॥ मी तुमचा असे
चोर ॥ श्रीपती वैश्य सावकार ॥ बोलावा आधीं तयासी ॥ ५८ ॥ तंव ते धांवली
सेवकांची मांदी ॥ वैश्य बैसला होता गादी ॥ म्हणती बोलाविलें रायें आधीं ॥
सत्वर तेथें चलावें ॥ ५९ ॥ वैश्य उठला झडकरोन ॥ येऊनि रायासी करी नमन ॥
राव म्हणे वैश्यालागुन ॥ हाचि तस्कर होय कीं ॥ ३६० ॥ वैश्य म्हणे रायासी ॥
आतां चला मम मंदिरासी ॥ अवश्य म्हणोनि वेगेंसी ॥ चित्रशाळेसी पातले ॥ ६१ ॥
तंव चित्रींचा निर्जीव हंस ॥ जेणें गिळिलें होतें हारास ॥ तो पुन्हां उगाळी सावकाश ॥
जैसा होता तैसाचि ॥ ६२ ॥ हार उगाळितां हंसानें ॥ तो पाहिला सर्व जनें ॥ हें आ-
श्चर्य सकळांकारणें ॥ म्हणती हें अघटित ॥ ६३ ॥ मग तो वैश्य वाणी ॥ बहु संतो-
षला निजमनीं ॥ कन्या अर्पूनि चरणीं ॥ विक्रमाच्या लागला ॥ ६४ ॥ जन म्हणती

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अघटित कळा ॥ निर्जीव लेपें हार गिळिला ॥ दोष लाविला महापुरुषाला ॥ तें आजी कळूं आलें ॥ ६५ ॥ चंद्रसेन पुसे विक्रमासी ॥ आपण राहतां कोणे देशीं ॥ कोण नाम कोणे वंशीं ॥ जन्म तुमचा सांगावा ॥ ६६ ॥ तंव विक्रम ह्मणे चंद्रसेना ॥ काय पुससी विचक्षणा ॥ मी असें उज्जनीचा राणा ॥ नाम माझें विक्रम ॥ ६७ ॥ ऐसें ऐकतां राजेश्वर ॥ घाली साष्टांग नमस्कार ॥ ह्मणे अन्याय घडला थोर ॥ कृपा करीं दयाळा ॥ ६८ ॥ तेव्हांच कीं असतें श्रुत ॥ तरी कष्ट कां होते प्राप्त ॥ न कळतां झालें अनुचित ॥ त्यासी उपाय कायसा ॥ ६९ ॥ विक्रम ह्मणे राजेश्वरा ॥ हा आमुच्या ग्रहदशेचा फेरा ॥ पूजन न केलें शनैश्चरा ॥ ह्मणोनि कष्ट पावलों ॥ ३७० ॥ जंव ग्रह नव्हता सानुकूळ ॥ ह्मणोनि तव बुद्धि विकळ ॥ आतां ग्रह झाला सानुकूळ ॥ ह्मणोनि ऐसें वदतोसी ॥ ७१ ॥ असो राजानें सोहळा केला फार ॥ फोडिलें द्रव्याचें भांडार ॥ धर्म केला अपार ॥ याचक जन संतोषती ॥ ७२ ॥ मग तो तेली बोलाविला ॥ विक्रमें तयासी नमस्कार केला ॥ एक देश तया देवविला ॥ सुखी

केला तये वेळीं ॥ ७३ ॥ चंद्रसेन हर्षभरित ॥ ह्मणे मम भाग्यासी नाहीं अंत ॥ विक्रम जोडला जामात ॥ धन्य मी एक संसारीं ॥ ७४ ॥ ऐसें करितां एक मास ॥ आला राया विक्रमास ॥ मग पुसोनियां चंद्रसेनास ॥ आज्ञा मागतसे नृपती ॥७५॥ मग चतुरंग दळ सिद्ध करून ॥ हत्ती घोडे दासदासी जाण ॥ देश पट्टणें ग्राम देऊन ॥ जामातासी बोळविलें ॥ ७६ ॥ तंव त्या सावकारें आपण ॥ नाना वस्तु अनर्घ्य रत्न ॥ विक्रमासी देऊन ॥ बोळवण केली कन्येची ॥ ७७ ॥ असो सवें घेऊनि दळभार ॥ उज्जनीसी आला राजेश्वर ॥ नगर शृंगारिलें सत्वर ॥ अति आनंद होतसे ॥ ७८ ॥ मग सुमुहूर्त पाहुनी ॥ विक्रम बैसविला सिंहासनीं ॥ याचक तृप्त केले दानीं ॥ चिंता चित्तीं असेना ॥ ७९ ॥ मग हें शनैश्चरव्रत ॥ राजा विक्रम आचरत ॥ पीडा गेली समस्त ॥ शनिप्रसादें करोन ॥ ३८० ॥ ही महाराष्ट्रभाषेची कथा ॥ परी अर्थाविषयीं नाहीं न्यूनता ॥ यथामती वर्णिली तत्त्वतां ॥ श्रवण करा भाविक हो ॥८१॥ हा ग्रंथ करितां श्रवण ॥ सकळ विघ्नें जातीं निरसून ॥ ग्रहपीडा अतिदारुण ॥ न बाधे कदा कल्पांतीं ॥ ८२ ॥ ऐकतां कथा नवग्रहांची ॥ येणें पीडा निवारे क्लेशांची ॥ वार्ताही

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नुरें दुःखाची ॥ कृपा करिती ग्रह सर्वे ॥ ८३ ॥ श्रवण पठणीं निजध्यास ॥ लेखक पाठक सर्वांस ॥ ग्रंथ संरक्षी तयास ॥ क्लेश विघ्नें न बाधिती कदा ॥ ८४ ॥ ही शनैश्चराची ख्याती ॥ केवल शनैश्चराची मूर्ती ॥ अहर्निशीं जे कां ध्याती ॥ त्यांसी संरक्षी शनिदेव ॥ ८५ ॥ सकळ दुःख दरिद्र ॥ येणें निरसेल समग्र ॥ भावें श्रवण करितां साचार ॥ फळ प्राप्त तयांसी ॥ ८६ ॥ ह्मणे तात्याजी महीपती ॥ हे प्रीतीं पावो शनैश्चरप्रती ॥ कृपालू तो उग्रमूर्ती ॥ निर्विघ्न करी सर्वांसी ॥ ८७ ॥ इति श्रीशनैश्चराची कथा ॥ त्याचा तोचि वदविता ॥ आपुली तों मायिक वार्ता ॥ करविता श्रीपांडुरंग ॥ ३८८ ॥

इति श्रीशनैश्चरमाहात्म्यं समाप्तम् ॥ ॥ शुभं भवतु ॥ ॥ श्रीरस्तु ॥

॥ अथ शनिस्तोत्रम् ॥

अस्य श्रीशनैश्चरस्तोत्रमंत्रस्यदशरथऋषिः । शनैश्चरोदेवता।त्रिष्टुप्छंदः।शनैश्चरप्रीत्यर्थं जपे विनियोगः । दशरथ उवाच । कोणोंऽतको रौद्र यमोऽथ बभ्रुः कृष्णः शनिः पिंगलमंदसौरिः । नित्यं स्मृतो यो हरते च पीडां तस्मै नमः श्रीरविनंदनाय ॥ १ ॥ सुराऽसुराः किंपुरुषा गणेंद्रा गंधर्वविद्याधरपन्नगाश्च । पीड्यंति सर्वे विषमस्थितेन तस्मै नमः श्रीर-

विनंदनाय ॥ २ ॥ नरा नरेंद्राः पशवो मृगेंद्रा वन्याश्चये कीटपतंगभृंगाः । पीड्यंति सर्वे विषमस्थितेन तस्मै नमः श्रीरविनंदनाय ॥ ३ ॥ देशाश्च दुर्गाणि वनानि यत्र सेनानिवेशाः पुरपत्तनानि ॥ पीडयंति सर्वे विषमस्थितेन तस्मै नमः श्रीरविनंदनाय ॥ ४ ॥ तिलैर्यवैर्माषगुडान्नदानैर्लोहेन नीलांबरदानतो वा । प्रीणाति मंत्रैर्निजवासरे च तस्मै नमः श्रीरविनंदनाय ॥ ५ ॥ प्रयागकूले यमुनातटे च सरस्वतीपुण्यजले गुहायाम् ॥ यो योगिनां ध्यानगतोऽपि सूक्ष्मस्तस्मै नमः श्रीरविनंदनाय ॥ ६ ॥ अन्यप्रदेशात्स्वगृहं प्रविष्टस्वदीयवारे स नरः सुखी स्याव् ॥ गृहाद्गतो यो न पुनः प्रयाति तस्मै नमः श्रीरविनंदनाय ॥ ॥ ७ ॥ स्रष्टा स्वयंभूर्भुवनत्रयस्य त्राता हरिः संहरते पिनाकी । एकस्त्रिधा ऋग्यजुःसामभूर्तिस्तस्मै नमः श्रीरविनंदनाय ॥ ८ ॥ शन्यष्टकं यः पठति प्रभाते नित्यं सुपुत्रैः पशुबांधवैश्च । लभेच्च सौख्यं भुवि भोगयुक्तं प्राप्नोति निर्वाणपदं परंते ॥ ९ ॥ कोणस्थः पिंगलो बभ्रुःकृष्णो रौद्रोंऽतको यमः । सौरिः शनैश्चरो मंदः पिप्पलादेन संस्तुतः ॥ १० ॥ एतानि दश नामानि प्रातरुत्थाय यः पठेव् । शनैश्चरकृता पीडा न कदाचिद्भविष्यति ॥ ॥ ११ ॥ इति श्रीदशरथप्रोक्तं शनैश्चरस्तोत्रं संपूर्णम् ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ अथ शन्यष्टकप्रारंभः ॥

नमोसूर्यसूतातुझीधन्यकीर्ती ॥ नचालेमतीवर्णितांस्तब्धहोती ॥ लिलानाटकीअंतनापार माया ॥ अहाधन्यतूझीशनीदेवराया ॥ १ ॥ अलिस्वारितीगोचरींदृष्टिठायीं ॥ सुखेसोयरे इच्छितीदुष्टताही ॥ धनाहानिहोतीनसेकांहिंमाया ॥ अहाध० ॥२॥ हनीमान्यतेलौकिकींद्वेषवाढे ॥ कुडेंपावडेंयेतिअंगालिगाडें ॥ नमीटेकधीयत्नजातातिवायां ॥ अहाध० ॥ ॥ ३ ॥ नमेकोटेकांहिंमनाजोसुवारा ॥ पडेअंतरींयेउनीदुःखमारा ॥ करूंइच्छितांगोष्टजातेअपाया ॥ अहाध० ॥ ४ ॥ कुटुंबांतजींप्रीयहोतीजिवाचीं ॥ तिहींफिरलींदुष्टझालींमनाचीं ॥ नमेताचियेतीमनामाजिठाया ॥ अहा० ॥ ५ ॥ नमेचैनकांहींउदासीमनातें ॥ तुझ्यावांचुनीकोणदेशांतियातें ॥ नकोक्लेशदावूंकरींपूर्णछाया ॥ अहाध० ॥ ६ ॥ उठेचित्तिं चिंताजिवागेमलागे ॥ झटेंझोंबटेंलागतापाठिमागें ॥ अहोरात्रतोत्रासवाटेजिवाया ॥ अहाध० ॥ ७ ॥ अबावीतलीलातुझीकोणवाणी ॥ चमत्कारतोदाविलाशूळपाणी ॥ गिरीकंदरींलाविलासीफिराया ॥ अहाध० ॥ ८ ॥ कथाऐकिलीसर्वहीविक्रमाची ॥ अलीत्यापरीसंधिवाटेअतांची ॥ महासंकटेंयेतिकंठींभिडाया ॥ अहाध० ॥ ९ ॥ फुटेछातितेएकतांसार्धसाती ॥ अतांतीअलीमाझियाकर्मपाती ॥ कृपावंततूंहातदेगातराया ॥ अहाधन्य० ॥ १० ॥ कितीदुःखसांगूंनसेपारयाला ॥ नसेथारकोठेंबसायामनाला ॥ कृपाळूपणेंपाहिंतूंहोयवाली ॥ प्रितीनेंपदीरुंजिरखमाजिघाली ॥ ११ ॥ ॥ समाप्त ॥

॥ आरती शनैश्चराची ॥

जयजयश्रीशनिदेवा ॥ पद्मकरशिरींठेवा ॥ आरती ओंवाळितों ॥ मनोभावेंकरुनिसेवा ॥ ध्रु० ॥ सूर्यसुताशनीमूर्ती ॥ तुझी अगाधकीर्ती ॥ एकमुखेंकायवर्णू ॥ शेषानचलेस्फूर्ती ॥ज०॥१॥ नवग्रहांमाजीश्रेष्ठ ॥ पराक्रमथोरतूझा ॥ ज्यावरीतूंकृपाकरिसी ॥ होयरंकाचाराजा ॥ ज०॥२॥ विक्रमासारिखाहो ॥ शककर्तापुण्यराशी ॥ गर्वधरितांशिक्षाकेली ॥ बहुछळियेलेंत्यासी ॥ ज० ॥ ३ ॥ शंकराच्यावरदानें ॥ गर्वरावणेंकेला ॥ साडेसातीयेतांत्यासी ॥ समूळनाशासीनेला ज०॥४॥ प्रत्यक्षगुरुनाथा ॥ चमत्कारदाखियेला॥ नेऊनिशूळापाशीं॥ पुन्हासन्मानकेला ॥ ज०॥५॥ ऐसेगुणकितीगाऊं॥ धणीनपुरेगातां ॥ कृपाकरीदीनावरी॥ महाराजासमर्था ॥ ज० ॥ ६ ॥ दोन्हीकरजोडोनीयां ॥ रखमालीनसदापायीं॥ प्रसादहाचि मागे ॥ उदयकाळसौख्यदावीं ॥ ७ ॥ जयजयश्रीशनिदेवा० ॥ ॥ ॥ ॥

मुद्रक व प्रकाशक-पं. घि. पाठक यांनी ' जगदीश्वर प्रेस ' गिरगांव गायवाडी घर नं. ९ मुंबई येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ इति शनिमाहात्म्य समाप्तः ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

[OrderDescription]
,CREATED=27.08.19 15:02
,TRANSFERRED=2019/08/27 at 15:09:17
,PAGES=27
,TYPE=STD
,NAME=S0001551
,Book Name=M-697-SHRISHANI MAHATMAY
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection